दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.६ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १०४ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 6 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 104 • Pages 4 • Rate 4 Rs

## महामानवास अभिवादन



दादरच्या स्मृतिभूमीकडे आज लाखो पावलांचा ओघ वाहत आहे पण खरं तर ही पावलं नाहीत, तर भावनांचे प्रवाह आहेत. ज्या महामानवाने इतिहासाचा चेहराच बदलला, त्या बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी आज सारे रस्ते निळ्या समुद्रात बदलले आहेत.

दूरवरून येणाऱ्यांच्या चेहऱ्यावर थकवा नाही कारण त्यांच्या हृदयात बाबासाहेबांचा विचार आहे. ज्यांनी आयुष्यभर अन्यायाच्या विरुद्ध ठाम उभं राहणं शिकवलं, ज्या व्यक्तिमत्त्वाने समानतेचा सूर्य उगवला–त्यांच्या समाधीसमोर उभं राहिलं की मन थरथरून जातं.

आज दादरमध्ये कोणाचाही धर्म, जाती, वर्ण, भाषा महत्त्वाची नाही.

महत्त्वाचं फक्त एक आभार. कृतज्ञता. निष्ठा.

आणि या निष्ठेच्या समुद्रात उभं राहून प्रत्येक जण मनात एकच वाक्य पुन्हा पुन्हा उच्चारत आहे

धन्यवाद बाबासाहेब आम्हाला माणूस बनवल्याबद्दल.

एक बाई आपल्या छोट्या मुलाचा हात धरून गर्दीतून पुढे जाते आहे.

त्या मुलाच्या निळ्या फेट्यावर उजळून निघालंय–जयभीम.त्या आईच्या डोळ्यात चमक आहे, अभिमान आहे.कारण ती जाणते हा निळा रंग फक्त एका व्यक्तीचा नव्हे, तर जगण्याचा प्रकाश आहे.

आजचा दिवस स्मरणाचा नाही

तो सतत जागृत राहणाऱ्या विचारांचा दिवस आहे.

महापरिनिर्वाण दिन हा शेवट नाही, तर सुरुवात आहे–

नव्याने उभं राहण्याची, नव्याने लढण्याची, नव्याने विचार करण्याची.

बाबासाहेबांच्या स्मृतिभूमीत उभं राहून जाणवतं–

ते नाहीसे झाले नाहीत

ते कालही होते, आजही आहेत, उद्याही राहतील.

त्यांचे विचार प्रत्येक अन्यायाला उत्तर देतात.

त्यांची शिकवण प्रत्येक पिडिताला आधार देते.

त्यांचे शब्द प्रत्येक स्वप्नांना पंख देतात.

आज दादरमध्ये नमन करणाऱ्यांची संख्या मोजता येणार नाही.

पण प्रत्येकाचं मन एकच म्हणत आहे–

बाबासाहेब, आपण जगाला दिलेला उजेड आम्ही कधीही विझू देणार नाही.

या महासागरात उभं राहून प्रत्येकाला एकाच भावनेने ओलांडून टाकलं आहे–

बाबासाहेब फक्त इतिहासात नाहीत

ते आपल्या रक्तात, विचारात आणि चालण्यात आहेत.

संपादकीय

# महामानवाला वंदन

जय भीम' अशी कोणी साद घातली, तर तो 'आंबेडकरवादी' असा पूर्वी समाजाचा दृष्टिकोन होता. दलित, वंचिताच्या हक्कांसाठी संघर्ष करणारे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानणारा वर्ग हा आज एका विशिष्ट समाजापुरता मर्यादित नाही, तर समतावादी विचार करणारा प्रत्येक भारतीयांचे डॉ. आंबेडकर हे प्रेरणास्थान आहेत. अभिनेत्री चिन्मयी सुमित हिने अलीकडेच एका कार्यक्रमात 'मी जय भिमवाली' आहे असे म्हटल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. संविधानाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकर यांनी स्त्रियांसाठी केलेले विशेष कायदे आणि दिलेल्या सवलतींमुळे प्रत्येक भारतीय स्त्रियांनी स्वत:ला 'जय भिमवाली' म्हणायला हवे, असे चिन्मयी म्हणाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज चैत्यभूमी परिसरात त्यांना अभिवादन करण्यासाठी लाखोंची गर्दी उसळते, त्यात सर्वच जाती-धर्मांच्या व्यक्तींचा सहभाग पाहायला मिळतो. बाबासाहेबांचे अभ्यासू व्यक्तिमत्त्व नव्या पिढीला भुरळ घालते. समाजातील उपेक्षित, वंचित घटकांना न्याय देण्यासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बाबासाहेबांचे कार्य अद्वितीय असे होतेच; पण त्यांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रांत दिलेल्या प्रचंड योगदानाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आधुनिक भारताला त्यांची सर्वात मोठी देणगी म्हणजे 'भारतीय राज्यघटना.' जगातील श्रेष्ठ घटनांमध्ये आपल्या देशाच्या घटनेचा समावेश होतो. समता, बंधुभाव आणि न्याय ही तत्त्वे आपल्या घटनेचा भक्कम पाया आहेत. भारतीय संविधानामुळे देशाला लोकशाही व्यवस्था मिळाली. समाजातील उपेक्षित आणि वंचित घटकांना विकास आणि प्रगती साध्य करण्यासाठी समान संधी राज्यघटनेमुळेच मिळाली. आपल्या देशाचे अखंडत्व आणि एकता टिकून ठेवण्याच्या संदर्भात भारतीय राज्यघटनेचे फार मोठे योगदान आहे, ही गोष्ट कोणालाही नाकारता येणार नाही.डॉ. आंबेडकर हे एक श्रेष्ठ संविधानतज्ज्ञ होते. त्यांनी ६० पेक्षा जास्त देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास केला होता. जगातील कोणत्याही राज्यघटनेत तरतूद नसलेली कलमे, म्हणजे मूलभूत हक्काची कलम १४ ते ३२ आपल्या संविधानात समाविष्ट करण्यात आली. 'कलम ३२' तर डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेचे हृदय म्हटले आहे. कारण, या कलमाद्वारे आपल्या हक्कांवर कोणीही गदा आणत असेल, तर आपल्याला सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. प्रत्येक नागरिकाला जगण्याचा मूलभूत हक्क दिला आहे. मग ती व्यक्ती कोणत्याही धर्माची, पंथाची, जातीची असो, त्यांना समान हक्काचे जीवन बहाल केले आहे. स्त्री-पुरुषांना समान अधिकार मिळवून दिला आहे. म्हणूनच आज मुख्यमंत्री, राज्यपाल, न्यायाधीश, लोकसभाध्यक्ष, पंतप्रधान, राष्ट्रपती आदी उच्चपदावर महिलांना मान मिळतो आहे. हे केवळ संविधानामुळेच शक्य झाले आहे. आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे, असे नमूद करून डॉ. आंबेडकरांनी कायद्यापुढे सर्व नागरिक समान आहेत, असे स्पष्ट केले होते. भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान भारतीय जनताच आहे, असा उल्लेख राज्य घटना सोपविताना त्यांनी केला होता. 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य' हे तत्त्वच मुळात आपल्या राजघटनेने स्वीकारलेले आहे. त्याच वेळेस काही इशारेदेखील दिले आहेत. डॉ. आंबेडकरांनी असे म्हटले होते की, 'घटना कितीही चांगली असली तरी राबवणारे लोक जर वाईट असतील, तर त्या घटनेचा उपयोग होणार नाही.' त्यामुळे भारतीय संविधानाची अंमलबजावणी जोपर्यंत प्रामाणिकपणे होणार नाही, तोपर्यंत आपण महासत्ता म्हणून जगाला मान्य होणार नाही. सामान्य माणसाच्या हाती ती सत्ता जाणार नाही. श्रीमंत व्यक्ती अधिक श्रीमंत होत राहील व कालांतराने सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या पराकोटीची विषमता माजेल. संविधानाची चांगल्या पद्धतीने अंमलबजावणी होणे म्हणून अत्यंत महत्त्वाचे आहे, हे द्रष्ट्या डॉ. बाबासाहेबांनी तेव्हाच ओळखले होते. डॉ. आंबेडकरांचा हा दृष्टिकोन लक्षात घेऊनच दक्षिण आफ्रिकेचे नेते नेल्सन मंडेला यांनी आणि नेपाळने आपली राज्यघटना लिहिताना डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा सखोल अभ्यास केला होता. भारतीय राज्यघटनेत प्राचीन भारतीय परंपरा आणि सर्वंकष परिवर्तन यांचा समतोल साधण्याचे फार अवघड काम बाबासाहेबांनी केले होते. खरंतर हे भीमधनुष्य पेलणे सोपे नव्हते. संविधानाच्या रूपाने एक राजकीय-सामाजिक क्रांतिकारी विधानच त्यांनी अस्तित्वात आणले. त्यातून भारताच्या आधुनिकीकरणाला जोरदार चालना मिळाली, हे सत्य कोणीही नाकारत नाही.भारतीय राज्यघटना ही भारतीय समाजाच्या आधुनिकीकरणाची शक्तिशाली प्रेरणा ठरावी हा प्रमुख राजकीय उद्देश डोळ्यांपुढे ठेऊन त्यांनी संविधानाची सगळी उभारणी केली. लोकशाही जीवनपद्धती आणि सामाजिक क्रांती यांच्यात एकसंधता आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. त्याचाच भाग म्हणून, लोकशाही, प्रातिनिधिक सरकार, व्यक्तिस्वातंत्र्य, कायद्यापुढे सर्वांची समानता या गोष्टी फार क्रांतिकारी ठरल्या. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या वैश्विक मूल्यांवर आधारित नवभारताची जडणघडण करण्याची कामगिरी त्यातूनच साकारली गेली. राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता अबाधित राखण्याचे आव्हान संविधानाने पेलले आहे. डॉ. आंबेडकर हे आधुनिक भारताच्या प्रमुख शिल्पकारांपैकी एक आहेत. देशाची प्रगती मोजण्याची फूटपट्टी काय असावी, याबाबत मत मांडताना बाबासाहेब नेहमी सांगायचे, ज्या देशात स्त्रियांची प्रगती झाली असेल, तोच देश प्रगत मानला पाहिजे. राजकारणात व पक्षसंघटनेत स्त्रियांना अग्रक्रम दिला पाहिजे याबाबत ते नेहमी आग्रही होते. आज डॉ. बाबासाहेब हे सामाजिक न्याय, ज्ञाननिर्मिती आणि लोकशाही विचारधारेचे प्रतीक बनले आहेत. डॉ. आंबेडकर हे कायदेतज्ज्ञ होते, राजकीय विचारवंत होते, जागतिक राजकीय विचारांचा आणि राजकारणाचा त्यांचा गाढा व्यासंग होता. भारतात जे लोकोत्तर पुरुष जन्मले, त्यापैकीच बाबासाहेब एक होते. सगळं जग आज ज्यांच्या विद्वत्तेने स्तिमित होते, जसा द्रष्टा देशाला घटनाकार म्हणून लाभला हे या देशाचे खरोखरच अहोभाग्य आहे.

## जानूजी निंगुळे यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



तालुक्यातील चिंचोली माळी येथील मूळ रहिवासी केज येथील प्रतिष्ठित सराफ व्यावसायिक जानूजी कोंडीबा निंगुळे वय ६५ वर्ष यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने शुक्रवार दि ५ रोजी सकाळी निधन झाले.त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. बप्पा म्हणून ते सर्व परिचित होते.

# आधुनिक भारताचा पाया!



गुलामगिरिमुळे मूक झालेल्या दीन दलितांचा आवाज महामानव डॉ .बाबासाहेब आंबेडकर जेव्हा निघून जातात. तेव्हा अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजातील दीन दलितांना किती शोककळा झाल्या असतील!याची कोणी कल्पनाही करू शकणार नाही . जेव्हा एखादा माणसांचा समूह, एखाद्या जमातीला नैसर्गिक हक्क नाकारतो, छळवणूक करतो आणि त्यांना यातून बाहेर काढण्यासाठी महामानव जन्म घेतो.त्या महामानवाच महापरिनिर्वाण भारतीयांनाच नाही तर जगाला झालेलं दुख! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनाची बातमी त्यावेळच्या जगभरातील वर्तमानपत्रात मथळ्याने छापून आली होती . एका महामानवाचा आवाज मूक झाला होता. भारताला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवण्यासाठी बाबासाहेब शेवटच्या श्वासापर्यंत लढले.ज्या बाबासाहेबांना अस्पृश्य म्हणून याच देशातील धर्ममार्तंडांनी जीवनभर छळले त्याच देशातील नागरिकांना बाबासाहेबांनी गोलमेज परिषदेत ब्रिटिश सरकारपुढे संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी आणि त्यात स्वतंत्र मतदारसंघांची मागणी केली. बाबासाहेबांचा लढा कोणत्याही एका जातीच्या लोकांसाठी नव्हता हे आपण प्रथम लक्षात घेतले पाहिजे.देशातील ओबीसींच्या आणि महिलांच्या हक्क , अधिकारांना न्याय देऊ शकत नसू तर आपल्या मंत्री पदाचा उपयोग नाही. म्हणून त्यांनी आपल्या केंद्रीय मंत्रिदाचा राजीनामा दिला. पृथ्वीतलावर अनेक राजे, सम्राट होऊन गेले. त्यांचा कार्यकाळ शासन असेपर्यंत असतो.पण, डॉ बाबासाहेब आंबेडकर कायम पृथ्वीवरील प्रत्येक जीवाला संरक्षण केलं आहे.ते पृथ्वी असेपर्यंत त्यांनी न झगडता दिलेले अधिकार त्रिकालाबाधित राहणार आहेत. ते म्हणजे संविधानाच्या माध्यमातून , भारताची जगात ओळख केवळ भारतीय संविधानामुळे आहे हे विसरून चालणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विविध क्षेत्रात निपून आणि तज्ञ होते.ते ज्या विषयाचा अभ्यास करायचे त्याचे मूळ ते शोधून त्यावर मानव कल्याणाकरिता विचार मांडायचे. जागतिक किर्तीचे विद्वान असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शेती विषयाचा विपूल अभ्यास आणि चिंतन केले. त्यांनी शेतीला व्यवसायिक दृष्टिकोनातून पाहिले. शेती व्यवसायाचा संबंध त्यांनी समाजव्यवस्थेशी जोडला. ग्रामीण भागातील जातीवर आधारित समाज व्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामीण आर्थिक व्यवस्थेमध्ये शोधलं होतं. त्यामुळेच जातीवर आधारित समाजव्यवस्था बदलायची, तर त्यासाठी शेतीमध्ये परिवर्तन घडवावे लागेल. शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे.असा त्यांचा अभ्यास होता.शेतकरी आर्थिक समृद्ध झाला तर शेतमजूर आणि शेतीशी निगडित सर्वच घटकाला या आर्थिक सक्षमतेचा फायदा होईल. आज अगदी तीच परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी सरकारी धोरणाने पिचला आहे त्यामुळे शेतमजूर लावणं त्याला परवडत नाही.ही वस्तुस्थिती हमी भावामुळे निर्माण झाली आहे.आर्थिक स्रोत तळागाळापर्यंत झिरपले म्हणजे ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडतील. हे बदल सामाजिक परिवर्तनासाठी पोषक ठरतील. आर्थिक विषमता ही जातीय व्यवस्थेला पूरक व पोषक ठरते. आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल, असे त्यांना वाटत होते. आज मागासवर्गीय समाज आर्थिक विषमतेच्या गर्तेत सापडला आहे.त्यामुळे जातीची दरी कमी होण्याऐवजी वाढतच आहे. हे वास्तव सध्या दिसते आहे.

शेतीसाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. शेतकऱ्याला शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे. पाण्याशिवाय उत्पादकता वाढणे आणि शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे शक्य नाही, हे त्यांनी ब्रिटिश सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. शेतीला शाश्वत पाणी पुरविण्यासाठी नदीच्या पाण्याचे नियोजन झाले पाहिजे. देशात घडणारे दुष्काळ हे मानवनिर्मित आहेत. दुष्काळ हटवायचा तर दुष्काळात पाण्याचे नियोजन करावे. जिरायती शेती, बागायती करण्याचे प्रयत्न वाढवावेत. शेती व शेतमजूर समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल, असे मौलिक विचार त्यांनी मांडले. पाण्यासंदर्भात केवळ विचार व्यक्त न करता त्यांनी ब्रिटिश सरकारला, नदीच्या खोऱ्यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली. ही योजना 'दामोदर खोरे परियोजना' म्हणून ओळखली जाते. आपल्या शासनाने १९९६ मध्ये कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा अशी खोऱ्यांची विभागणी केली. यावरून आंबेडकरांच्या दूरदर्शीपणाची लांबी व खोली लक्षात येते.यावरून डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांची काय दूरदृष्टी होती याची कोणी कल्पनाही करू शकत नाही. तत्कालिन ब्रिटिश सरकारला त्यांनी तत्कालीन आणि विद्यमान परिस्थितीत मांडली. आज पाण्याची गरज शेतीला किती आहे याची जाणीव शेतकऱ्यांना व सरकारला होते आहे. यापेक्षा सर्वात महत्त्वाचे म्हणजे डॉ. आंबेडकर यांनी सर्वांत महत्त्वाची संकल्पना मांडली ती 'शेतीचे राष्ट्रीयकरण' करण्याची. शासनाने शेतजमिनी ताब्यात घेऊन, त्या विकसित कराव्यात, अशा विकसित शेतजमिनी शेतकऱ्यांना काही अटींवर कसण्यासाठी द्याव्यात. हा एका अर्थाने सामुदायिक शेतीचाच प्रयोग होता. अशी शेती करण्यासाठी शासनाने अधिनियम बनवावेत. पीकपद्धती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत. यामुळे कोणत्याही एकाच पिकाखाली मोठे क्षेत्र येऊन, शेतमालाच्या उपलब्धतेत विषमता येणार नाही. मागणी व पुरवठा या अर्थशास्त्रीय नियमानुसार, शेतमालाला रास्त भाव मिळतील. त्याचबरोबर अतिरिक्त उत्पादन टळून शेतमालाचे नुकसानही टळेल. आजही शेतकऱ्यांना शेतमालाला रास्त भाव मिळावा यासाठी शासनाशी झगडावे लागते. या पार्श्वभूमीवर आंबेडकर यांचे शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा ही संकल्पना शेतकऱ्यांसाठी किती मोलाची आहे, हे अधोरेखित होते. डॉ. आंबेडकर यांच्या काही संकल्पनातूनच कमाल जमीनधारणा कायदा, सावकारी व खोती पद्धतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेतीचे प्रणालीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नद्यांच्या खोऱ्यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना अमलात आल्या. शासनाने त्याबाबत कायदे व नियम बनविले. यामागे आंबडकरांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. आंबडकरांचे शेतीबाबतचे विचार राज्यकर्ते नियोजनकार व शेती तज्ज्ञांनी अभ्यासले पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीविषयक प्रश्न आजही जैसे थे आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीविषयक प्रश्न आणि त्यावरील उपाय त्यावेळी मांडले ते आजही प्रासंगिक आणि त्रिकालाबाधित सत्य आहेत.

मूकनायक डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे ६ डिसेंबर १९५६ ला महापरिनिर्वाण झाले आणि आधुनिक भारताचा अभियंता कोटी कोटी भारतीयांतून निघून गेला . परंतु, आधुनिक भारताचा पाया मात्र, डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी घालून दिला. त्यामुळे त्यांना आधुनिक भारताचे निर्माते म्हणतात. बाबासाहेब म्हणतात की,मी सुरवातीला भारतीय आहे आणि अंतिमतः ही भारतीय आहे. बाबासाहेबांच्या याचं विचारातून त्यांचं देशाबद्दल असलेलं प्रेम लक्षात येतं.देशाच्या सद्य परिस्थितीत काही सनातनी विचार प्रथम धर्म म्हणतं वावरतांना दिसत आहे.हे आधुनिक भारताचे विचार असू शकतं नाहीत. डॉ . बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, माणूस धर्माकरिता नाही, तर धर्म हा माणसाकरिता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आज ६९ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करत असताना, केवळ अभिवादन करून स्वतः ला धन्यता मानण्यात काहीच अर्थ नाही. आंबेडकरी चळवळ केवळ अनुयायांपुरतीच मर्यादित राहिली आहे.ती सवर्ण, ओबीसी, एसटी आदी पर्यंत जायला हवी. त्यासाठी सर्व आंबेडकरी नागरिकांनी प्रतिज्ञा घेतली पाहिजे. तरच बाबासाहेबांना खरे अभिवादन ठरेल ! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व भारतीयांसाठी कार्य केले.त्या सर्वच भारतीयांनी बाबासाहेबांच्या स्वप्नातला भारत घडवण्यासाठी एक झाले पाहिजे. केवळ अभिवादन करून,हात झटकने आणि बाबासाहेबांना डोक्यावर घेणे, मतांसाठी त्यांचा जयजयकार करणे टाळावे आणि तमाम भारतीय नागरिकांनी केवळ दलितांनी किंवा बौद्धांनी नव्हे, सर्वांणीच सर्वांगीण विकासाकरिता आधुनिक भारतासाठी त्यांच्या विचारांवर अंमल झाला पाहिजे. सरकार असो, अथवा जनता सर्वांनीच भारताचे लोक म्हणून प्रयत्न करुया! आजच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त खरे अभिवादन ठरेल!

**- पदमाकर उखळीकर ,**
**( लेखक मुक्त पत्रकार आहेत. )**
**मो. ९९७५१८८९१२.**
kalpadmakarukhlikargmail.com

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचे शिल्पकार



भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी होऊन गेले आहेत की त्यांचे कार्य, विचार आणि जाणीवा एका कालखंडापुरत्या मर्यादित राहत नाहीत; त्या पिढ्यानपिढ्या समाजाला दिशा देतात, प्रेरणा देतात आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला नव्या उंचीवर नेतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असेच कालजयी व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका नेत्याची आठवण नव्हे, तर न्याय, समता, स्वाभिमान आणि संघर्षाच्या मूल्यांना पुनश्च जागृत करणे होय. भारतातील दलित, वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी केलेले कार्य हे मानवाधिकार, सामाजिक लोकशाही आणि समतामूलक राष्ट्रनिर्मितीचे ध्वजवाहक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी सुरुवातीला ज्या सामाजिक आणि ऐतिहासिक वास्तवात त्यांनी जीवनाची सुरुवात केली ते समजणे आवश्यक आहे. अस्पृश्यता ही जणू सामाजिक संस्थाच बनली होती. जन्म म्हणजे कर्म, आणि कर्म म्हणजे जात ही विचारधारा भारतीय समाजावर ठसवण्यात आली होती. परंतु या रूढीवाद, अवैज्ञानिकता आणि सामाजिक विषमतेचे निःशब्द बळी होण्याऐवजी त्यांनी त्याविरोधात बौद्धिक क्रांती उभारली. समाजाने दिलेली ओळख स्वीकारण्याऐवजी त्यांनी स्वतःची ओळख ज्ञान, संघर्ष आणि नेतृत्वातून घडवली. ते म्हणत असत की माझे आयुष्य हे जन्माचे फळ नाही, तर माझ्या संघर्षाचे यश आहे.त्यांनी शिक्षणाला मुक्तीचे माध्यम बनवले. शिक्षण मिळवणे हे जणू त्यांच्या जीवनातील सामाजिक अन्यायाविरुद्धचे पहिले युद्धच होते. समाजाने 'अस्पृश्य', 'अयोग्य' म्हणत जे दरवाजे बंद केले, ते त्यांनी मेहनतीने, बुद्धिमत्तेने आणि चिकाटीने उघडले. कोलंबिया विद्यापीठातून पीएच.डी., लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधील बॅरिस्टर, कायद्याची पदवी यामुळे ते फक्त भारतासाठीच नव्हे तर जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त विचारवंत ठरले. त्यांचे अध्ययन केवळ पुस्तकापुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक वास्तवाचे अभ्यासक होते. त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कायदा, राजकीय तत्त्वज्ञान, स्त्री-अधिकार, धर्म, इतिहास, मानवाधिकार आणि सामाजिक मानसशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत अभ्यास केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या व्यक्तीगत संघर्षातून उभा राहिला. जिथे एक 'जात' मनुष्याच्या अस्तित्वाचे मूल्य ठरवत होती, तिथे त्यांनी मानवतेचा, बंधुत्वाचा आणि समतेचा नवा सामाजिक अर्थ प्रस्तावित केला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा फक्त पाण्याचा प्रश्न नव्हता तर तो मानवी प्रतिष्ठा आणि मूलभूत हक्कांचा प्रश्न होता. त्या आंदोलनात हम पानी लेंगे, हक्क से लेंगे! असे त्यांनी सांगत भेदभावग्रस्त समाजाला पहिल्यांदा स्वाभिमानाची ताकद दिली.नंतर नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहामध्ये त्यांनी धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. मनुष्य देवाच्या निर्मितीचा असतो, परंतु जातव्यवस्था मनुष्यांच्या बनावट नियमांची ही घोषणा ज्या समाजात अस्पृश्यांना देवासमोर उभे राहण्याचा अधिकार नव्हता, त्या समाजात क्रांतिकारी होती. या आंदोलनांनी अस्पृश्यतेच्या भिंती फक्त हादरवल्या नाहीत, तर कोसळायला सुरुवात केली.त्यांच्या सामाजिक कार्याचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे महिलांसाठी दिलेले अधिकार. स्त्रियांच्या शिक्षणाचे, समतेचे आणि स्वातंत्र्याचे त्यांनी सर्वाधिक जोरदार समर्थन केले. हिंदू कोड बिलच्या माध्यमातून स्त्रियांना संपत्ती, विवाह, घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या अधिकारांची हमी देण्याचा त्यांचा प्रयत्न हा स्त्री-मुक्तीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. तथापि, या सुधारणा मंजूर करण्यास विरोध झाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देताना स्पष्टपणे सांगितले की जे समाज स्त्रीला समानता देत नाहीत, त्यांची प्रगती कधीही होऊ शकत नाही.भारतीय संविधानाच्या रूपात त्यांनी देशाला नव्या सामाजिक व्यवस्थेचा आराखडा दिला. हे संविधान फक्त कायद्यांचा संच नाही तर ते भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्याचे, सन्मानाचे आणि मानवाधिकारांचे संरक्षण करणारे जिवंत दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की राजकीय लोकशाही पुरेशी नाही; ती सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर आधारित असली पाहिजे. यामध्येच भारतीय समाजक्रांतीचे मूलतत्त्व दडलेले होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले. भारतातील शेतकरी, कामगार यांचे प्रश्न त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडले. जमीन सुधारणा, राष्ट्रीय जलनीती, औद्योगिकीकरण, बँकिंग क्षेत्र, वित्तीय व्यवस्थापन आणि कामगार कायदे या सर्व क्षेत्रांत त्यांनी मार्गदर्शक धोरणे मांडली. रिजर्व्ह बँकेच्या स्थापनेमागील त्यांची आर्थिक संकल्पना ही त्यांच्या अभ्यासाची खोली दर्शवणारी होती.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फक्त समाजसुधारणेपुरते मर्यादित नव्हते तर ते मानवमुक्तीचे अभियान होते. त्यांनी धर्माच्या नावावर चालणाऱ्या अन्यायाला आव्हान दिले आणि अखेर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्विकारला. हा निर्णय संतापाचा नव्हता, तर आत्मसन्मानाचा आणि विवेकाधिष्ठित धर्माचा स्वीकार होता. ते म्हणाले होते की मी हिंदू म्हणून जन्मलो, हे माझ्या हातात नव्हते; पण मी हिंदू म्हणून मरणार नाही, हे मी ठरवले. आणि या निर्णयातून त्यांनी भारतीय इतिहासाला नव्याने 'बौद्धयुग' दिले.आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांकडे पाहतो तेव्हा एक प्रश्न उभा राहतो की त्यांचे स्वप्न कितपत पूर्ण झाले? संविधानाचा आदर करणे, समानता स्वीकारणे, जातभेद नष्ट करणे, मानवतेच्या मूल्यांचे पालन करणे ही मूल्ये आज अजूनही संघर्षात आहेत. जातीय हिंसा, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता, महिलांवरील अत्याचार, धार्मिक ध्रुवीकरण आणि शिक्षणातला वर्गविचार आजही अस्तित्वात आहे. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक चळवळ संपलेली नाही तर ती अजूनही चालूच आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मंत्र शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र केवळ घोषवाक्य नसून सामाजिक परिवर्तनाचे क्रियासूत्र आहे. शिक्षण हे व्यक्तीला विचार देतं; संघटना व्यक्तीला शक्ती देते; आणि संघर्ष व्यक्तीला इतिहास बदलण्याची ताकद देतो. हा संघर्ष द्वेषाचा नाही; तर न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेच्या स्थापनेसाठी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महत्ता फक्त भारतीय समाजापुरती मर्यादित नाही तर जगातील सामाजिक न्यायाच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मानवसंस्कृतीच्या इतिहासात अभिमानाने घेतले जाते. ते फक्त संविधानकार नाहीत; ते मानवतेचे अभियंते आहेत. ते फक्त नेता नाहीत; ते विचारयुगाचे निर्माता आहेत. ते फक्त इतिहासाचा भाग नाहीत; तर ते भविष्याचा मार्ग आहेत.आज ६ डिसेंबर रोजी असणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्मृतीदिन हा केवळ अभिवादनाचा क्षण नसून जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांच्या कार्याचे, तत्त्वज्ञानाचे, सामाजिक उभारणीच्या दृष्टिकोनाचे अनुसरण करणे हीच खरी कृतज्ञता आहे. त्यांचा विचार जिवंत राहिला, न्यायव्यवस्था समतामूलक राहिली, समाजाने मनुष्याला मनुष्य म्हणून स्वीकारले तरच त्यांचे स्वप्न पूर्ण होईल. आपण सर्वांनी एकत्र येऊन केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला नव्हे, तर त्यांच्या विचारांना वंदन करणे ही काळाची गरज आहे.अशा या ज्ञानाच्या प्रतीकला विनम्र अभिवादन.....



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक )**
**मो. ९९६०१०३५८२,**
bagate.rajendra5gmail.com

# परळी शहरातील प्रभाग १, प्रभाग ११ प्रभाग १२ येथे फेर मतदान घ्या

## मुख्य निवडणूक आयुक्ताकडे दीपक देशमुख यांनी केली मागणी

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र, शहरातील काही प्रभागांमध्ये बोगस मतदान झाले आहे याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख व माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख यांनी पुनः मतदान करण्याची मागणी केली आहे.परळी वैजनाथ येथील निवडणूक मतदानादिवशी झालेल्या प्रभाग १ , प्रभाग ११ प्रभाग १२ येथे बोगस मतदान, सीसीटीव्ही तपासणी, या तीन प्रभागात फेर मतदार घेण्यात यावे. निवडणूक प्रशासन पोलीस प्रशासनाकडून पक्षपातीपणा उच्चस्तरीय सखोल चौकशी करून कारवाई करावी .

याबाबत राज्य निवडणूक आयुक्तास सौ. संध्या दीपक (नाना) देशमुख, दीपक रंगनाथ देशमुख यांनी निवेदन केले आहे. परळी वैजनाथ येथे दि. २ डिसेंबर २०२५ रोजी परळी शहरातील प्रभाग क्रमांक १, प्रभाग, प्रभाग ११, क्रमांक १२ या ठिकाणी बोगस मतदान झाले आहे. या बूथवर फेर मतदान घेण्यात यावे. या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज चेक करून, कारवाई करावी, व याच ठिकाणी सि.सि टी.व्ही बंद होते. या ठिकाणी बोगस मतदान करण्यात आले. या ठिकाणी देखील फेर मतदान घेण्यात यावे त्याचा आक्षेप मतदान प्रक्रिया चालू असताना घेतला गेला होता. परंतु नियम दाखवून उमेदवार व त्यांचे बुथ प्रतिनिधी यांना उडवाउडवीची उत्तरे व उद्धटपणाची वागणूक या बुथ वर काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून झाली, तसेच पोलीस कर्मचारी देखील विरोधी पक्षाच्या उमेदवारांना चांगली वागणूक व इतर उमेदवारांना जाणीवपूर्वक मतदार केंद्रावर येण्यापासून रोखले, प्रभाग १ वर १९ वर्षाच्या मतदाराचे मतदान ७० वर्षाचा व्यक्ती करताना आढळून आला. या ठिकाणी आक्षेप घेतले गेले असताना आक्षेप घेणाऱ्या उमेदवार व त्याच्या प्रतिनिधीला उडवाउडुची उत्तरे देण्यात आली व अन्याय केला, याच बुथवर सीसीटीव्ही कॅमेरा देखील काळा कपडा लावून बंद करण्यात आला होता. यावरही ऑब्जेक्शन घेतले परंतु त्या ठिकाणी कसल्या प्रकारचा न्यायनिवाडा झाला नाही. प्रभाग १२ मध्ये भाजपचा कार्यकर्ता पवन फुटके व त्याचे इतर साथीदार याने तर खूप उच्छाद मांडला होता मतदान करण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक महिलेसोबत बुथ वर येऊन प्रत्येक महिलेचा नातेवाईक आसे भासऊन मतदान करून घेत होता. त्याही गोष्टीला विरोध करून या घटने संदर्भात २ डिसेंबर रोजी पत्रकार परिषदेतील घेण्यात आली होती. या ठिकाणी बोगस मतदान झाले आहे. ज्या ठिकाणी आक्षेप घेतल्या त्या ठिकाणी सीसीटीव्ही फुटेज तपासून बंद असलेल्या सीसीटीव्हीची तपासणी करून, बंद असलेल्या मतदान केंद्रावर फेर मतदान घेण्यात यावे. व योग्य ती कार्यवाही करावी अशी अपेक्षा या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.आता आपणच निवडणूक व्यवस्थेचे प्रमुख म्हणून सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ती कठोर कारवाई करून लोकशाही वाचवून उमेदवाराला व जनतेला न्याय द्यावा. अशी मागणी राज्य निवडणूक आयुक्तास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार सौ. संध्या दीपक (नाना) देशमुख,व माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ यांनी केली आहे.



# जिल्हा परिषद ढाकेफळ शाळेच्या विद्यार्थ्यांचे योगासन स्पर्धेत राज्य स्तरावर घवघवीत यश

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**




राज्यस्तरीय योगासन स्पर्धा दिनांक २ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथे उत्साहात पार पडल्या.या योगासन स्पर्धेसाठी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ढाकेफळ येथील विद्यार्थिनीं कु.कार्तिकी ज्ञानेश्वर थोरात व कु.प्रियंका गोविंद थोरात यांनी आर्टिस्टिक पीअर योगा या प्रकारामध्ये राज्यस्तरावर तृतीय क्रमांक मिळवून घवघवीत यश मिळवले.राज्य स्तरावर खेळण्यापूर्वी सदरील विद्यार्थिनींचा तालुका जिल्हा व विभाग स्तरावर प्रथम क्रमांक आलेला होता.त्यामुळेच त्या राज्यस्तरावर खेळण्यासाठी पात्र ठरल्या आहेत.राज्य स्तरावर आठ विभागातून आलेल्या विविध स्पर्धकांनी सर्वोत्कृष्ट अशी योगासने सादर केली. सादर केलेल्या योगासना मध्ये ढाकेफळ शाळेच्या विद्यार्थिनींनी सर्व तृतीय क्रमांक मिळवला.छत्रपती संभाजी नगर विभागातून योगासनामध्ये बक्षीस मिळवणारी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ढाकेफळ ही एकमेव शाळा आहे.

मागासलेल्या व ग्रामीण भागातून सदरील विद्यार्थिनी राज्यस्तरावर खेळावयास गेल्या व यश मिळवले त्याबद्दल कार्तिकी ज्ञानेश्वर थोरात व प्रियंका गोविंद थोरात तसेच त्यांना उत्तम प्रशिक्षण देऊन योग्य मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका श्रीमती मेघना नेहरकर मॅडम शाळेचे मुख्याध्यापक श्री.धनराज अंधारे सर व सर्व स्टाफ यांचे सर्व स्तराकडून कौतुक होत आहे.शाळेने मिळवलेल्या यायशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष श्री.ज्ञानेश्वर थोरात उपाध्यक्ष श्रीमती आशाबी उस्मान सय्यद यांनी कौतुक केले.केज केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. संजय चवरे सर,ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री.दत्तात्रय चाटे तसेच केज तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी सुनील केंद्रे यांनी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशा बद्दल त्यांचे कौतुक केले व त्यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदच्या शाळा या दर्जेदार असूनविद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याकडे त्यांचा कल असतो हे ढाकेफळ गावच्या शाळेने सिद्ध करून दाखवले आहे.

# दाळींब येथे रक्तदान शिबिरात १०१ रक्तदात्यानी केले रक्तदान



दैनिक वादळ वार्ता
**उमरगा । प्रतिनिधी**

उमरगा तालुक्यातील दाळींब येथील माजी उपसभापती सुरेश आप्पा वाले यांच्या बासष्टव्या वाढदिवसानिमित्त स्वप्निल भैय्या वाले मित्र मंडळाच्यावतीने'रक्तदान हेच महादान या तुमचे रक्त कोणाला तरी जिवन देऊ शकते वेळेची गरज आणि सामाजिक भान लक्षात घेऊन रक्तदान करूया ,दान नाही तर कर्तव्य आहे आपलं असे विचार सुरेश आप्पा वाले यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर मध्ये दिसुन आले.उद्देशाने दाळींब येथील डॉ मुलांनी यांच्या क्लिनिक मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिर मध्ये रक्तदान करणार्यांना प्रमाणपत्र देण्यात आले या रक्तदान शिबीर मध्ये १०१ रक्तदात्यानी रक्तदान केले हे रक्त संचलन श्रिकृष्ण ब्लड बँक उमरगा यांच्या माध्यमातून करण्यात यावेळी ब्लड बॅकेचे योगेश सोनकांबळे,विजय केवडकर ,धिरज लगदिवे,रूपाली जाधव, कौस्तुभ गहीरवार आदींच्या टिमने कार्य केले या रक्तदान शिबिर मध्ये स्वप्निल वाले, डॉ महेबुब मुलांनी, डॉ आमर पावडशेट्टी,आमर वाले,अजय वाले,विजय फडताळे,रोहन कुडकल,श्याम हिंडोळे,आमर शिरोळे , सचिन भगत ,महेश सातपुते यांच्यासह आयोजक स्वप्निल वाले मित्र मंडळ दाळींब यांचे पदाधिकारी परिश्रम घेतले

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघाच्या वतीने ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण कार्यक्रम केज येथे दि ७ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता गट शिक्षणाधिकारी कार्यालय, केज येथे होणार आहे. शिक्षकांच्या योगदानाचे मूल्य अधोरेखित करण्यासाठी, तसेच त्यांच्या कार्याचा समाजमान्य गौरव व्हावा या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे असणार आहेत.शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्याला विशेष महत्त्व देणार आहे. शिक्षणक्षेत्रात नवनवीन प्रयोग करणारे, विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षण रुजवणारे, समाजाभिमुख कार्य करणारे तसेच शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आदर्श शिक्षकांचा सन्मान या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार महादेवी फुलसुरे, मोहन ढाकणे, व्यंकट चव्हाण, संध्याराणी कोल्हे, सुरेखा मोराळे, नवनाथ घुगे, रेखा धेंडे, संगीता नवले, नितीन हावळे ,स्वाती वरपे, बाबुराव तांबडे ,बालासाहेब लोखंडे, आश्रुबा गायकवाड, पुंडलिक पोपळघाट, शामल जाधव या शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती डॉ.अशोक थोरात संचालक, आरोग्य विमा महामंडळ, महाराष्ट्र राज्य तहसीलदार राकेश गिड्डे : तहसीलदार, केज शैलेश फडसे मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड नगरपरिषद, जी.बी गदळे : सचिव, जीवन विकास शिक्षण मंडळ, केज, नागनाथ जाधव जिल्हाध्यक्ष म.से.सं. बीड शिवश्री. डॉ. भाऊसाहेब चाळक जिल्हा उपाध्यक्ष म.से.सं. बीड, दत्तात्रय चाटे शिक्षण विस्तार अधिकारी, हनुमंत भोसले सामाजिक कार्यकर्ते, केज,हनुमंत घाडगे ज्येष्ठ साहित्यिक, केज, डॉ.हनुमंत सौदागर जनार्धन सोनवणे ज्येष्ठ साहित्यिक, केज, शिवाजी ठोंबरे जिल्हाध्यक्ष छावा संघटना, बीड भाई मोहन गुंड नेते, शेकाप, केज विनोद शिंदे जिल्हाध्यक्ष, म.से.सं, समन्वयक, बीड गोविंद शिनगारे , केज राहुल खोडसे जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, बीड यांसह विविध मान्यवरांची, शिक्षक आणि अधिकारी यांची उपस्थिती लाभणार आहे. शिक्षक हा समाजाचा दिशा-दर्शक दीपस्तंभ आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविणे, विचारसंपन्न समाजनिर्मिती करणे आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक तयार करणे ही जबाबदारी शिक्षक पार पाडत असतात. समाजातील या कर्तव्यदक्ष शिक्षकांना सन्मानित करून प्रेरणेचा संदेश देणे, ही काळाची गरज असल्याचे मत कार्यक्रम आयोजकांनी व्यक्त केले. मराठा सेवा संघ, शाखा केज यांनी गेल्या काही वर्षांत विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रमांद्वारे समाजाभिमुख कार्य सिद्ध केले आहे. त्याच परंपरेत आदर्श शिक्षक गौरव सोहळा हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. आदर्श शिक्षकांचा गौरव झाल्याने नव्या पिढीत शिक्षणाबद्दल आदर, कर्तृत्व आणि प्रेरणा वाढीस लागेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमास शिक्षक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा सेवा संघ शाखा केज सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# दत्त संस्थान, बालाघाट येथे दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र दत्त संस्थान, बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे दत्त जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साह, श्रद्धा आणि भक्तिभावाने संपन्न झाला. सद्गुरु शिवानंद शिवाचार्य महाराज यांच्या कृपाशिर्वादाने तसेच दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा भव्यदिव्य पद्धतीने पार पडला.

कार्यक्रमाअंतर्गत दुपारी बारा वाजता दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त श्री दत्तांच्या मूर्तीचा अभिषेक, गोमातेची पूजा यांसारखे पारंपरिक विधी भाविकांच्या उपस्थितीत पार पडले. सकाळी उदंडवडगाव (शिवाजीनगर) येथील भजन मंडळाने सादर केलेले संगीत भजन भाविकांच्या मनाला स्पर्शून गेले. रात्री मोरगाव, मांजरसुंबा व वरवटी येथील भजनी मंडळाने सादर केलेल्या जागरणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.सोहळ्यात साजरी करण्यात आलेली सती अनुसया मातांची झाकी विशेष आकर्षणाचा



केंद्रबिंदू ठरली. या झाकीची कु.प्रार्थना अमोल ढास यांनी प्रभावीपणे सादर केली.

दत्त संस्थानाच्या परिसरात आयोजित या पवित्र जन्मोत्सव सोहळ्यास परिसरातील विविध गावांमधील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली व भक्तिभावाने सहभाग नोंदविला.

# नंदुरबार जिल्ह्यात जन्म-मृत्यु नोंदणी प्रक्रियेला 'मिशन मोड' वर गती; प्रलंबित नोंदींसाठी १६ डिसेंबरची अंतिम मुदत

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रिया अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि वेळेवर पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक ४ रोजी झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत, प्रलंबित नोंदींचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश देण्यात आले, तसेच यासाठी १६ डिसेंबर २०२५ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार, शासन निर्णय १६ सप्टेंबर २०२५ नुसार सर्व निबंधकांना १ वर्षावरील प्रलंबित जन्म-मृत्यु नोंदींचे 'अ, ब, क' श्रेणीनुसार तातडीने वर्गीकरण करून त्या नोंदवहीत स्पष्टपणे नमूद करण्याचे आदेश दिले आहेत. या सर्व कार्यवाहीसाठी १६ डिसेंबर २०२५ ही अंतिम मुदत असल्याने, सर्व संबंधित विभागांना 'मिशन मोड'वर काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बैठकीत शासकीय आरोग्य संस्थांच्या भूमिकेवर विशेष भर देण्यात आला.



जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांना त्यांच्या स्तरावरील प्रलंबित जन्म-मृत्यु नोंदींचा तात्काळ निपटारा करण्याचे आदेश देण्यात आले.यापुढे, नागरिक-केंद्री सेवा म्हणून, आरोग्य संस्थांमधून मातेला डिस्चार्ज देताना बाळाचे जन्म प्रमाणपत्र त्वरित देण्याची सक्ती करण्यात आली आहे. यामुळे पालकांना पुढील शासकीय कामकाजासाठी मोठी सोय होणार आहे. जिल्ह्यातील विलंबित नोंदींची संख्या शून्यावर आणणे, हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. त्यासाठी सर्व निबंधकांना जन्म-मृत्यु नोंदणी २१ दिवसांच्या आत अनिवार्यपणे पूर्ण करण्याचे कठोर निर्देश देण्यात आले आहेत. प्रशासनाने घेतलेला हा निर्णय नागरिकसेवा अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असून, जिल्ह्याच्या सुशासनाकडे वाटचाल दर्शवणारा आहे.

# राज्यव्यापी 'शाळा बंद' आंदोलनाला बीड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

## जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्री आणि शिक्षण मंत्र्यांना दिले निवेदन!

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील जि. प.,खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित, विनाअनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या राज्य पातळीवरील संघटना व त्यांची समन्वय समितीच्या राज्यातील शिक्षकांना लागू करण्यात टीईटीची सक्ती रद्द करा. या प्रमुख प्रमुख मागणीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी राज्यभर पुकारलेल्या 'शाळा बंद' आंदोलनाला बीड जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील जिल्हा परिषद, खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा देत आंदोलनात सहभाग नोंदविला. शासन आणि प्रशासनाच्या दडपशाहीकडे दुर्लक्ष करत आंदोलन यशस्वी झाल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून आले.काही ठिकाणी शिक्षकांनी काळ्या फिती बांधून शासनाचा निषेध



नोंदविला.

याबाबत अधिक माहिती अशी की, राज्यात २०१३ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना 'टीईटी -सक्ती 'रद्द करावी,संच मान्यते संबंधीचा १५ मार्च ,२०२४ चा शासन आदेश रद्द करुन जुने निकष लागू करावेत, हजारों शाळा बंद पाडणारे शिक्षक व विद्यार्थ्यांचे देखिल नुकसान करणारे, शिक्षक समयोजनाचे धोरण रद्द करावे, जि. प. शिक्षकांना स्थगित केलेल्या पदोन्नती द्याव्यात, १०-२०-३० आश्वाशित प्रगती योजना लागू करावी, शिक्षण क्षेत्रातील कंत्राटी करण थांबवावे, या व अनेक प्रलंबित-दुर्लक्षित मागण्यांकडे शासन-प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज एक दिवस शाळा बंद आंदोलन करण्यात आले. सदरील आंदोलन करू नये यासाठी शासनाच्या वतीने दडपशाहीचे तंत्र अवलंबिले जात होते. परंतु दडपशाहीला न जुमानता बीड मधील जवळपास ४०% शाळेत शाळेतील हजारो शिक्षकांनी आंदोलन यशस्वी केले. दरम्यान शिक्षकांना बीडमध्ये शिक्षकांना मोर्चा काढण्यास पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारल्यामुळे शिक्षक संघटनेच्या वतीने नाराजी व्यक्त करण्यात आली. दुपारी शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांचे मार्फत राज्याचे मुख्यमंत्री आणि शिक्षण मंत्री यांना निवेदन देण्यात आले.

# ऊसतोडणीच्या अनास्थेचा फटका! बोरद परिसरातील शेतकऱ्यांच्या हातून गव्हाचा हंगाम निसटला; हरभऱ्याच्या पेरणीवर सर्वाधिक भर

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

ऊस तोडणीच्या विलंबाने बोरद परिसरातील रब्बी हंगामाचे संपूर्ण वेळापत्रक कोलमडले आहे. सध्या परिसरात ऊस तोडणी आणि केळी कापणीची कामे सुरू असली तरी, हजारो शेतकऱ्यांचा ऊसतोडणीचा 'नंबर' अजूनही लागलेला नाही. याचा थेट परिणाम गव्हाच्या पेरणीवर झाला असून, गव्हाची पेरणी होणे अत्यावश्यक असतानाही शेत खाली होत नसल्याने अनेक शेतकरी नाईलाजाने गव्हाऐवजी हरभऱ्याच्या पिकाला पसंती देत असल्याचे चित्र आहे. डिसेंबर महिना हा रब्बी हंगामातील मुख्य पीक असलेल्या गव्हाच्या पेरणीसाठी सर्वांत योग्य मानला जातो. मात्र, ऊस शेतात उभा असल्याने पेरणी लांबली आहे. पुढील महिन्यात, म्हणजेच जानेवारीमध्ये गव्हाची पेरणी केल्यास उत्पादनात लक्षणीय घट होते. हा धोका



लक्षात घेऊन, शेतकरी आता गव्हाची पेरणी करणे टाळत आहेत. यामुळे परिसरात अजूनही गव्हाची पेरणी झालेली नसल्याने गहू नजरेस पडत नाही. ज्या शेतकऱ्यांची ऊस तोडणी वेळेवर झाली आहे, त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता शेतीत हरभऱ्याची पेरणी केली आहे. हरभरा हे कमी कालावधीत आणि कमी पाण्यावर येणारे पीक असल्याने, ऊस तोडणीमुळे वाया गेलेला वेळ भरून काढण्यासाठी शेतकरी हरभऱ्याला सर्वाधिक प्राधान्य देत आहेत. शेतकरी म्हणतात ऊसतोडणी कधी होईल याची खात्री नाही. वेळेत गव्हाची पेरणी झाली नाही, तर उत्पादन कमी होते. त्यामुळे आम्ही गव्हाची आशा सोडून दिली आहे आणि वेळ वाचवण्यासाठी हरभऱ्याची पेरणी केली आहे. हरभऱ्याला अंकुर फुटले असून, सर्वत्र हरभऱ्याची हिरवळ दिसत आहे, असे मत परिसरातील एका शेतकऱ्याने व्यक्त केले. गेल्या वर्षी देखील बोरद परिसरामध्ये गव्हाची पेरणी अत्यल्प झाली होती, तर त्या तुलनेत हरभऱ्याची पेरणी मोठ्या प्रमाणात झाली होती. यावर्षीही तीच परिस्थिती नजरेसमोरून जात आहे. ऊस तोडणीच्या नियोजनातील त्रुटी आणि व्यवस्थापनातील अनास्थेमुळे शेतकऱ्याला दरवर्षी आपल्या पीक पद्धतीत बदल करण्यास भाग पाडले जात आहे. पुढील महिन्यात (जानेवारी) जर ऊस तोडणीला आणखी विलंब झाला, तर बहुतांश शेतकरी गव्हाची पेरणी न करता पूर्णतः हरभऱ्याला पसंती देतील आणि गव्हाचा हंगाम पूर्णपणे हातून जाईल, अशी शक्यता आहे .

**यावर्षी एका शेतकऱ्याने हरभऱ्याची पेरणी ठिबक सिंचन वर केली आहे ठिबक सिंचन वापरून पिकाचे उत्पन्न वाढवता येते असे शासन देखील म्हणते आणि शेतकरी देखील म्हणतात याचाच अवलंब करत बोरद ते मोड रस्त्यादरम्यान एका शेतकऱ्याने आपल्या शेतात ठिबक सिंचनचा आधार घेऊन हरभऱ्याची पेरणी केली आहे त्यामुळे हरभऱ्याचे पीक देखील चांगलेच बहरले आहे.**

# श्री दत्त जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिर



दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

भाविकांचे श्रद्धास्थान समजले जाणाऱ्या नवसाला पावणाऱ्या स्वामी समर्थ केंद्र नायगांव आयोजित श्रीदत्त जयंती निमित्त स्वामी समर्थ केंद्र येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराच्या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन भाविकांच्या उपस्थितीत नायगांव नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी दिलीप पाटील चव्हाण, शहराध्यक्ष कॉंग्रेस पांडुरंग, पाटील चव्हाण युवक कॉंग्रेसचे ता.अध्यक्ष माणिक पाटील चव्हाण, नगरसेवक विठ्ठल आप्पा बेळगे, विश्वनाथ बोंमनाळे, विश्वनाथ पाटील दमलुरे, बळवंत कुरे, पाटील सर, मुन्ना ठाकूर, महेश पांचाळ, साईनाथ चव्हाण, आदी सह भाविक भक्त महिला .पुरुष. मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खा.रजनीताई पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

## वृक्षारोपण वक्तृत्व,निबंध ,रांगोळी स्पर्धा, विद्यार्थ्यांना फळ वाटप

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

राज्यसभेच्या खासदार कॉंग्रेसच्या नेत्या केज ,माऊली विद्यापीठाच्या संस्थापक खा रजनीताई अशोकराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माऊली विद्यापीठ अंतर्गत विविध शाळा महाविद्यालयात , , विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, खाऊ वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला. संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे यांच्या नियोजनातून विविध उपक्रम घेण्यात आले. प्राथमिक माध्यमिक विद्यालय उमरी येथे विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. रामराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात वाचनस्पर्धा, घेण्यात



आली. स्वच्छता अभियान ,वृक्षारोपण करण्यात आले.सरस्वती कन्या प्रशाळेत गीतगायन स्पर्धा,फळे वाटप करण्यात आले. राजीव गांधी माध्यमिक विद्यालयात साहित्य, विद्यार्थ्यांना खाऊ वाटप. महिला कला महाविद्यालय वृक्षारोपण, माऊली प्राथमिक विद्यालय बीड प्रश्न मंजुषा स्पर्धा घेण्यात आली. प्रमिला देवी पाटील कला महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. केज येथील बालवाडी ,आदर्श प्राथमिक शाळेत सुंदर हस्ताक्षर, रागोळी, चित्र रंगभरण स्पर्धा घेण्यात आली सरस्वती महाविद्यालय, भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय, महाविद्यालयाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. अनावश्यक खर्च टाळून सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य श्री लुंगारे,डॉ हनुमंत सौदागर, डॉ जी बी पाटील, मुख्याध्यापक श्री खोसे, मुख्याध्यापिका श्रीमती डोंगरे ,मुख्याध्यापक श्री सोनवणे, मुख्याध्यापक राम कांबळे,मुख्याध्यापक नितीन रसाळ,मुख्याध्यापक संदीप सत्वधर, सहशिक्षक विलास भिसे आदींच्या नियोजनातून उपक्रम घेण्यात आले. कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ५५ वर्षीय गुराखी बाबांनी उचलले प्रशासनाचे काम 'खाई ते गोरजाबारी' रस्त्याचे खड्डे स्वखर्चाने भरले!

## महिला आणि चिमुकल्यांचा त्रास बघवेना, १५ दिवसांपासून स्व-सेवेतून रस्ता दुरुस्तीचे कार्य

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील खाई ते गोरजाबारी या तीन किलोमीटर लांबीच्या घाट सेक्शनमधील रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली असून, मोठमोठे खड्डे पडल्याने हा रस्ता वाहनधारकांसाठी अत्यंत धोकादायक ठरला आहे. मात्र, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे झालेल्या या गैरसोयीवर मात करण्यासाठी, खाई येथील ५५ वर्षीय एका गुराखी बाबांनी गेल्या पंधरा दिवसांपासून स्व:तच्या हिमतीवर समाजसेवेचे व्रत हाती घेतले आहे.

**प्रवाशांना असह्य त्रास**

हा घाट सेक्शनचा रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाल्यामुळे अनेक अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः मोटारसायकलवरून प्रवास करणाऱ्या महिलांना चिमुकल्या मुलांसह खड्ड्यांच्या



भीतीने खाली उतरावे लागते आणि त्यांना काही अंतर पायी चालावे लागते. याशिवाय, रस्त्यावर काही ठिकाणी मातीचा मलबा आणि दगड पडल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे.

**रायसिग वळवी यांचे सेवाकार्य**

खाई येथील रहिवासी असलेले रायसिग दोहर्या वळवी (वय ५५) हे परिसरामध्ये गुरे चारण्याचे काम करतात. रस्त्याच्या या दुरवस्थेमुळे महिला व लहान मुलांना होणारा त्रास पाहून त्यांचे मन हेलावले. मला ते पाहून वाईट वाटते आणि मनाला चांगले वाटत नाही, असे सांगत, त्यांनी प्रशासनाची वाट न पाहता स्वतःहून खड्डे भरण्याचे कार्य सुरू केले.

गेल्या पंधरा दिवसांपासून, रायसिग बाबा गुरे चारताना सोबत तगारी (परात) आणि पावडी घेऊन जातात. रस्त्याशेजारील माती गोळा करून ते धोकादायक खड्ड्यांमध्ये टाकून भरत आहेत. जेणेकरून महिलांना आणि प्रवाशांना होणारा त्रास कमी होईल.

**नागरिकांकडून कौतुक आणि मागणी**

रायसिग बाबांचे हे निस्वार्थ कार्य पाहून या रस्त्यावरून ये-जा करणारे प्रवासी आणि वाहनधारक त्यांचे जोरदार कौतुक करत आहेत आणि त्यांना 'सेवाभावी बाबा' म्हणून ओळखू लागले आहेत.

दरम्यान, खाई, गोरजाबारी, ओहवा, वाडीखाडीसह परिसरातील नागरिकांनी आणि वाहनधारकांनी बांधकाम विभाग किंवा संबंधित यंत्रणेकडे तातडीने या ३ किलोमीटर रस्त्याची दुरुस्ती करण्याची आणि रस्त्यावरील मातीचा मलबा व दगड त्वरित हटवण्याची मागणी केली आहे. एका सामान्य गुराखी बाबांनी दाखवलेला हा सामाजिक बांधिलकीचा आदर्श प्रशासनाला लवकर जाग आणेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भारतीय जनता मजदुर संघाची देहरादून येथे बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**देहरादून । प्रतिनिधी**

भारतीय जनता मजदूर संघाच्या उत्तराखंड राज्यातील संघटन विस्तारासाठी आज देहरादून येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.या बैठकीत राष्ट्रीय सचिव आरती गौर यांच्या उपस्थितीत संघटन विस्तार,भावी कार्ययोजना तसेच श्रमिक कल्याण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस संघटनेचे राष्ट्रीय महासचिव चौधरी चरण सिंह,राष्ट्रीय सचिव लोकेंद्र तसेच उत्तराखंडच्या आरती गौर यांची प्रमुख उपस्थिती होती.दिल्लीहून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी आरती गौर यांचा सत्कार केला.त्याचप्रमाणे गौर यांनीही दिल्लीतील मान्यवरांचे स्वागत करून कृतज्ञता व्यक्त केली.

बैठकीत उत्तराखंडमध्ये भारतीय जनता मजदूर संघाचा संघटनात्मक विस्तार वेगाने करण्याचा निर्धार करण्यात आला. विविध श्रमिक वर्गांसाठी स्वतंत्र बोर्डची स्थापना, पदाधिकाऱ्यांची नियुक्ती तसेच श्रमिक कल्याणा साठी नवीन उपक्रम राबविण्याबाबत प्राथमिक सहमती दर्शविण्यात आली.ही बैठक राष्ट्रीय अध्यक्ष शांतप्रकाश जाटव



यांच्या सूचनेनुसार आयोजित करण्यात आली होती.संघटनेने राज्यातील श्रमिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत येत्या काळात ठोस आणि प्रभावीपावले उचलण्याचा विश्वास व्यक्त केला. दरम्यान,महाराष्ट्रात संघटन कार्यात सक्रिय असलेल्या भारतीय जनता मजदूर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके,राज्य सचिव धनंजय कुलकर्णी, मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील आदी कार्यकर्त्यांचेही या बैठकीत अभिनंदन करण्यात आले.

# तळोदा-शहादा मार्गावर भीषण अपघात: स्विफ्ट डिझायर आणि ॲपे रिक्षाची जोरदार धडक; प्रवाशी जखमी, पोलीस घटनास्थळी दाखल!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा-शहादा रस्त्यावर आज, दिनांक ०५ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास एक भीषण अपघात झाला. शहाद्याकडे जाणाऱ्या स्विफ्ट डिझायर (क्रमांक. एम एच ३९ डी २८०३) आणि खरवड, तालुका तळोदा दिशेने निघालेल्या ॲपे रिक्षा (क्रमांक एम एच ०१ एल ए ४७८०) यांच्यात जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की, रिक्षा रस्त्यालगत असलेल्या तळोदा येथील स्मशानभूमी नजीकच्या नाल्यात जाऊन आदळली.

अपघातात स्विफ्ट डिझायर या चारचाकी वाहनाने रस्त्यावरील एका फलकालाही धडक दिली. यामुळे गाडीच्या उजव्या बाजूच्या टायरचे तसेच उजव्या बाजूच्या संपूर्ण बॉडीचे मोठे नुकसान झाले आहे. रिक्षा नाल्यात कोसळल्याने तिचेही मोठे नुकसान झाले असण्याची शक्यता आहे.

या अपघातात ॲपे रिक्षामध्ये असलेले प्रवासी गंभीर जखमी






झाले आहेत. त्यांना तातडीने मदतीसाठी धावून आलेल्या नागरिकांनी खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, पुढील व अधिक उपचारांसाठी त्यांना लागलीच तळोदा येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच तळोदा पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तात्काळ घटनेच्या पंचनाम्याला सुरुवात केली. अपघातानंतर वाहतुकीचा खोळंबा होऊ नये यासाठी पोलिसांनी अपघातग्रस्त वाहन बाजूला करण्याचे काम सुरू केले आहे. अपघातानंतर स्विफ्ट डिझायरचा गाडी मालक घटनास्थळावरून पसार झाला असला तरी, त्याने लगेच पोलीस स्टेशन गाठल्याचे वृत्त आहे.

या घटनेबाबत पोलिसांनी सांगितले की स्विफ्ट डिझायर या गाडीचा उजव्या बाजूचा टायर फुटल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि ही घटना घडली आहे. या घटनेची पोलिस सविस्तर चौकशी करत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077